



# पारनेर दर्शन





वर्ष ३ अंक ९५, गुरुवार ६ मार्च २०२५ | ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये

# नगर-पुणे रेल्वेमार्गासंदर्भात खा. लंकेंची बैठक

## ■ निंबळक, विळद येथील रेल्वे उड्डाणपुलास मंजुरी ■ खा. नीलेश लंके यांची माहिती

**अहिल्यानगर : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर-पुणे या रेल्वेमार्गासंदर्भात रेल्वे अधिकाऱ्यांसमवेत खा. नीलेश लंके यांची अहिल्यानगर येथे महत्वपुर्ण बैठक पार पडली. खा. लंके यांनी यापूर्वी मागणी केलेल्या निंबळक व विळद येथील रेल्वे उड्डाणपुलास रेल्वे मंत्रालयाने मंजुरी दिल्याची माहिती खा. लंके यांनी पत्रकारांना दिली.**

दळवणवळण सुलभ होऊन जिल्ह्याच्या सर्वांगिण विकास व्हावा यासाठी खा. लंके यांनी छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर-पुणे असा रेल्वेमार्ग सुरू करण्याची मागणी खा. लंके यांनी रेल्वे मंत्रालयाकडे केली असून त्यासंदर्भात दिल्ली येथे त्यांचा पाठपुरावा सुरू आहे. या पार्श्वभुमीवर रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत अहिल्यानगर येथे महत्वपुर्ण बैठक पार पडली. यावेळी संभाजीनगर ते पुणे रेल्वे मार्गाबरोबरच नगर पुणे इंटरसिटी सेवा, निंबळक, विळद येथील मंजुर उड्डाणपुलाच्या कामासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली.

खा. लंके यांनी सांगितले की, संभाजीनगर-अहिल्यानगर-पुणे या रेल्वे मार्गासंदर्भात आपण संसदेत मागणी केली होती. या मागणीचा आपण रेल्वे मंत्रालयाकडेही पाठपुरावा करत आहोत. आपण प्रस्तावित केलेल्या रेल्वे मार्गावर श्री.क्षेत्र देवगड, श्री. क्षेत्र शनिशिंगणापुर, रांजणगांव गणपती या प्रसिध्द तिर्थस्थळांबरोबरच वाळुंज, नगर, सुपा-पारनेर, रांजणगांव या औद्योगिक क्षेत्रांचा समावेश आहे. हा मार्ग झाल्यानंतर तिर्थक्षेत्रांना भेटी देणाऱ्या भाविकांबरोबरच औद्योगिक वसाहतीमध्ये तयार होणारी उत्पादने तसेच या उद्योगांना लागणारा कच्चा माल याच्या वाहतूकीचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.



■ छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर-पुणे या रेल्वेमार्गासंदर्भात खा. नीलेश लंके यांची रेल्वे विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक पार पडली.

### इंटरसिटी सेवेच्या मागणीस प्रतिसाद

नगर ते पुणे या मार्गावर जिल्ह्यातील अनेक नागरीक दररोज प्रवास करतात. नोकरदार, विद्यार्थी, व्यापारी वर्गाला पुण्यात पोहचण्यासाठी तसेच पुण्याहून नगरकडे पोहचण्यासाठी वाहतूक कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागतो. या प्रवाशांच्या सोईसाठी नगर-पुणे ही इंटरसिटी रेल्वे सेवा ट्रायल ॲण्ड रन बेसिसवर सुरू करण्याची मागणी करण्यात आली असून या मागणीस सकारात्मक प्रतिसाद मिळत असून ही सेवा लवकरच सुरू होईल असा विश्वास खा. लंके यांनी व्यक्त केला.

### विळद, निंबळक उड्डाणपुलांना मंजुरी

नगर तालुक्यातील निंबळक तसेच विळद येथील रेल्वे उड्डाणपुलासंदर्भात संसदेत आवाज उठविण्यात आला होता. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या मंत्रालयाशी पाठपुरावा केल्यानंतर या दोन्ही उड्डाणपुलांना मंत्री वैष्णव यांनी मंजुरी दिली असून तसे पत्र खा. लंके यांना प्राप्त झाले आहे. या रेल्वे उड्डाण पुलांच्या कामांना लवकरात लवकर सुरूवात करण्यासंदर्भात या बैठकीत चर्चा करण्यात आली.

### संभाजीनगर-अहिल्यानगर मार्गाचे सर्वेक्षण

खा. लंके यांनी सांगितले की आपण केलेल्या मागणीनुसार तसेच रेल्वे मंत्रालयाकडे केलल्या पाठपुराव्यानंतर छत्रपती संभाजीनगर ते अहिल्यानगर या ८० किलोमीटर रेल्वेमार्गाचे सर्वेक्षण पुर्ण झाले असून या कामास लवकरच सुरूवात होणार असल्याचे ते म्हणाले.

### अखेरपर्यंत पाठपुरावा

जिल्हयाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आपण संसदेमध्ये विविध प्रकल्पांची मागणी करत आहोत. छत्रपती संभाजीनगर, सुपा-पारनेर-रांजणगांव ही औद्योगीक क्षेत्रे झपाट्याने विकसित होत आहे. देशातील महत्वाची औद्योगीक क्षेत्र अशी त्यांची ओळख निर्माण झाली आहे. या पार्श्वभुमीवर दळणवळणाच्या दृष्टीने रेल्वे मार्ग हे अत्यंत महत्वाचे असल्याने आपण त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला आहे. या मागणीची तड लागेपर्यंत आपण स्वस्थ बसणार नाही.

# सावरगांवच्या काळेवाडीत 'पुष्पा' !

## ■ २५ कोटींचे रक्तचंदन घेऊन जाताना पकडला ! ■ कर्जुले-सावरगांव परिसरातील काळे कारनामे पुन्हा चर्चेत

**पिंपरी चिंचवड : विशेष प्रतिनिधी**

**चंदन, रक्तचंदन, गारगोटी आदींची तस्करी करण्यात माहीर असलेल्या कर्जुले-सावरगांव परिसर पुन्हा एकदा चर्चेत आला आहे ! पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर पिंपरी-चिंचवड पोलीसांनी केलेल्या कारवाईत २५ कोटी रूपयांचे रक्तचंदन पकडण्यात आले असून या तस्करीचा मास्टरमाईड पारनेर तालुक्यातील सावरगांव-काळेवाडी येथील आहे. त्याच्यासह त्याच्या साथीदारास अटक करण्यात आली आहे.**

पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरून कोट्यावधी रूपयांच्या रक्तचंदनाची तस्करी होणार असल्याची माहीती पिंपरी चिंचवड पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक महेश खाडे व नितीन लोखंडे यांना मिळाल्यानंतर त्यांनी पोलीस निरीक्षक विजय ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली द्रुतगती मार्गावरील उर्से टोलनाक्यावर सापळा लाऊन वाहनांची तपासणी करण्यात आली असता एका कंटेनरमधून तब्बल २५ कोटी रूपये किंमतीचे रक्तचंदन अवैध मार्गाने वाहतूक करण्यात येत असल्याचे आढळून आले.

कंटेनर टोलनाक्यावर आल्यानंतर पोलीसांच्या पथकाने चालक तसेच कंटेनरसोबत असलेल्या इतर व्यक्तींची चौकशी केली असता त्यांनी सुरूवातीस उडवाउडवीची उत्तरे दिली. कंटेनर चालक तसेच त्यासोबत असलेल्या इतरांकडून प्रतिसाद न मिळाल्याने पोलीसांनी वन विभागाचे अधिकारी तसेच पंचांसमक्ष कंटेनरचे सील तोडून पाहणी केली असता त्यात तब्बल २५ कोटी रूपये किंमतीचे रक्तचंदन आढळून आले.



### आंतरराष्ट्रीय ट्रान्सपोर्ट कंपनी

पोलीसांनी कारवाई केलेला कंटेनर हा आंतरराष्ट्रीय ट्रान्सपोर्ट कंपनीचा आहे. सिलबंद असलेल्या चाळीस फुट कंटेनरवर कारवाई करण्यात आल्यानंतर तडजोडीचीही चर्चा झाली. २५ कोटी रूपये किंमतीचे रक्तचंदन असताना ते ८ ते ९ कोटी रूपये किंमतीचे असल्याचे भासविण्यात येत असल्याने या प्रकरणाविषयी संशय व्यक्त करण्यात येत आहे.

### कर्जुले-सावरगांवात चंदन, गारगोटी तस्कर !

यापूर्वी चंदन तस्करीप्रकरणी कर्जुले-सावरगांव परिसरातून काही लोकांवर पोलीसांनी कारवाई केलेली आहे. काही दिवस ही तस्करी थांबल्याचे चित्र निर्माण झालेले असताना पुन्हा काळेवाडीचा पुष्पा पोलीसांनी जेरबंद केल्याने या भागात हे उद्योग सुरूच असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, रक्तचंदन प्रकरणी तालुक्यातील अळकुटी परिसरातील पुष्पाही यापूर्वी चांगलाच गाजलेला आहे. दरम्यान, विविध तेल कंपन्यांच्या तेलांमध्ये भेसळ करून गब्बर होणारेही या भागात सध्या व्हाईट कॉलर म्हणून मिरवत आहेत !

### हे आहेत आरोपी

सावरगांव काळेवाडी येथील राजाराम गंगाराम गायखे वय ३७ रा. काळेवाडी, सावरगांव ता. पारनेर, व हरप्रितसिंग धरमसिंग बदाना वय ४२ रा. ठाणे यांना पिंपरी चिंचवड पोलीसांनी त्यांच्यासोबतच्या रक्तचंदनाने भरलेल्या कंटेनरसह अटक करण्यात आली असून पुढील तपास पिंपरी चिंचवड पोलीस करत आहेत.

# धनंजय मुंडेंनी वाल्मीक कराडचा बळी दिला !

## मनोज जरांगे यांचा दावा | आता कराडनेही एकट्याने न मरता धनंजय मुंडेंचे नाव घ्यावे

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांनी स्वतःला वाचवण्यासाठी आपला मित्र वाल्मीक कराडाच बळी दिल्याचा आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी बुधवारी केला. वाल्मीक कराडसारख्या माणसाकडे एवढे वैभव कसे आले? हे वैभव त्याचे स्वतःचे नाही तर धनंजय मुंडेंचे आहे. कराडने सगळे पाप मुंडेंसाठी केले. पण आज मुंडे हे पाप वाटून घेण्यास तयार नाहीत. त्यांनी स्वतःला वाचवण्यासाठी कराडचा बळी दिला. त्याला वापरून फेकून दिले, असे ते म्हणालेत.**

मनोज जरांगे यांच्यावर येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तिथे ते पत्रकारांशी वार्तालाप करताना म्हणाले की, धनंजय मुंडे यांचा राजीनामा झाला. पण आता त्यांची आमदारकीही काढून घ्यावी. त्यांच्या चार-पाच चौकशा होण्याची गरज आहे. त्यांचे कार्यालय या प्रकरणातील १ नंबरचा आरोपी (वाल्मीक कराड) चालवत होता का? याचा तपास सीआयडीने करावा. दोन ते मंत्री असताना हा एक नंबरचा आरोपी त्यांचे आर्थिक व व्यवसाय कारभार पाहत होता का? याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. तीन, जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचे काम धनंजय मुंडे यांच्यावतीने तोच करून देत होता का? याचीही सीआयडी व एसआयटी चौकशी झाली पाहिजे.



चौथे असे की, संतोष देशमुखांचा खून झाला तेव्हा या प्रकरणातील आरोपींनी धनंजय मुंडे यांच्याशी संपर्क साधला होता का? केला होता.१०० टक्के केला होता. त्याची चौकशी करा. त्यांनी आरोपींना वाचवण्यासाठी मदत केली होती हे स्पष्ट होते. ही बाब बीडच्या यापूर्वीच्या पोलिस अधीक्षकांनाही माहिती आहे. त्यामुळे त्यांचे संपूर्ण कॉल डिटेल्स काढण्याची गरज आहे. या प्रकरणातील एक नंबरचा आरोपी धनंजय मुंडेंचा संपूर्ण कारभार पाहत होता. याची चौकशी करण्याची गरज आहे. कारण, खून झाल्याची व खंडणी मागितल्याची संपूर्ण माहिती धनंजय मुंडे यांना होती. यामुळे ते ३०२ चे सहआरोपी ठरतात, असे मनोज जरांगे म्हणाले.

फरार आरोपीला पळून जाण्यासाठी धनंजय मुंडे यांनी मदत केली का? याची चौकशी होण्याची गरजेची आहे. यासंबंधी त्यांचा संतोष देशमुख यांचा खून होण्यापूर्वी ५-६ दिवस अगोदर ते राजीनामा देईपर्यंतचा संपूर्ण सीडीआर काढला पाहिजे. त्यांनी १०० टक्के आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी स्वतः आपली माणसे पाठवली आहेत. त्यामुळे त्यांना अटक करून चौकशी करावी अशी आमची मागणी आहे, असे जरांगे मुख्यमंत्र्यांना उद्देशून म्हणाले.

# छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास जिवंत होणार!

## | संगमेश्वरातील सरदेसाई वाडा होणार स्मारकात रूपांतर | मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजी महाराजांना संगमेश्वरातील सरदेसाई वाड्यात कैद झाली होती. आजही या वाड्याचे अवशेष आहेत. हा वाडा अधिग्रहित करून तिथे छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधीमंडळात याबाबतची घोषणा केली.**



छत्रपती संभाजी महाराजांचे शेवटचे वास्तव्य असलेले ठिकाण म्हणजे संगमेश्वरातील सरदेसाई वाडा. छावा चित्रपटानंतर सरदेसाई वाडा पाहण्यासाठी पर्यटक गर्दी करत आहेत. त्यामुळे राज्यसरकाने संगमेश्वरातील ऐतिहासिक सरदेसाई वाड्याचे स्मारकात रूपांतर करण्याची घोषणा केली आहे. राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात राष्ट्रवादीचे उर्वरीत पान ३ वर

# यंदा लाडक्या बहिणींना २१०० नाहीत !

## जाहीरनामा हा ५ वर्षांसाठी असतो | मंत्री अदिती तटकरे यांची माहिती | सतेज पाटलांची टीका

**मुंबई : प्रतिनिधी**

**देवेंद्र फडणवीस यांनी बजेटच्या वेळी २१०० रुपये घोषित करु असे वक्तव्य केले नाही.१०० टक्के आम्ही महिलांना २१०० रुपये देणार आहोत. पाच वर्षांसाठी जाहीर नामा तयार केलेला असतो. मंत्रिमंडळ जेव्हा तसे सूचित करेल तेव्हा आमच्या खात्याकडून तसा प्रस्ताव आपल्यासमोर ठेवण्यात येईल, अशी माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी विधान परिषदेत दिली आहे.**

अदिती तटकरे पुढे बोलताना म्हणाल्या की, लाडकी बहीण योजना जाहीर झाल्यापासून विरोधकांकडून योजनेवर टीका सुरू आहे. ही योजना लाडक्या बहीणींची सर्वात आवडती योजना ठरली. म्हणून कुठेतरी पहिल्यामहिन्यात पावणेदोन कोटी महिलांना लाभ मिळाला. तर निवडणुकीनंतर २ कोटी ४५ लाख महिलांना लाभ मिळाला. तर आता २ कोटी ५२ लाख महिलांना लाभ देणार आहोत. आम्ही निवडणुकीच्या आधी वेगळी निवडणुकीनंतर वेगळी भूमिका घेत नाही.

**राजकीय हेतू ठेवत ही योजना- सतेज पाटील**

यावर बोलताना काँग्रेस नेते सतेज पाटील म्हणाले की, योजना सुरू करताना राज्य शासनाने १० जीआर काढले. तेव्हा राजकीय हेतू ठेवत ही योजना



सुरू केली हे सर्वांना माहिती आहे. योजना करताना विचारपूर्वक निर्णय झाला नाही. राजकीय हेतू ठेवत निर्णय घेण्यात आला. लोकसभा निवडणुकीत महायुतीला जो फटका बसला त्याचा उतारा म्हणून ही योजना काढण्यात आला. बहीणींवर प्रेम म्हणून ही योजना काढण्यात आली नाही. मंत्री आज जे निकष सांगत आहेत ते पहिल्यापासून होते. त्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांची होती. ज्यांना अपात्र करताय त्यांची फसवणूक केली जात आहे.

**बहिणी सावत्र वाटायला लागल्या का?**

सतेज पाटील म्हणाले की, तुम्ही जीआर काढत एक अशासकीय सदस्य अध्यक्ष केला आणि त्याला हे मान्य करण्यासाठी कायद्याने अधिकार दिले. खाली तुम्ही लिहले की ग्रामसेवक, अधिकाऱ्यांचे प्रमाणमत्र घ्या. तेव्हा जर योग्य होते तर आता अपात्र करू नका. तेव्हा लाडकी बहीण होती तर आता सावत्र बहीण आहे का? निकाल लागल्यावर बहिणी सावत्र वाटायला लागल्या का?

**..तर पुढील वर्षभराचे अनुदान एकदाच द्या**

पाटील सतेज पाटील म्हणाले की, पुढचे अनुदान आधी मिळेल अशी एकही योजना राज्यात नाही. पण लाडक्या बहीणींला निवडणुकीपूर्वी २ महिन्याचे अनुदान दिले. राज्यातील मते मिळावे म्हणून हे सर्व केले. गतिमान सरकार असेल तुमच्यात ताकद असेल तर पुढील वर्षभराचे अनुदान एकदाच द्या, असा टोलाही त्यांनी सराकारला लगावला आहे. निकाल लागला की अनुदान थांबवण्याचे काम केले गेले.

**२१०० रुपये कधी देणार सांगितले जात नाही**

सतेज पाटील म्हणाले की, २१०० रुपयांची तारीख सांगितली जात नाही. तुम्ही ज्यांना अपात्र केले त्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या समितीने पात्र केले होते. निकषात बदल करणार का? असा सवाल पटेल यांनी उपस्थित केला. तर वर्षभराचे पैसे दिले तर कोल्हापुरात सरकारचा जाहीर सत्कार करतो असेही त्यांनी यावेळी म्हटले आहे.



# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या

## गुगल मॅपवरून घरातील फोटो आणि व्हिडिओ कसे हटवाल ?

**गुगल मॅप स्ट्रीट व्ह्यूमध्ये तुमच्या घराचे फोटो आणि व्हिडिओ असतात, जे तुमच्या गोपनीयतेसाठी धोकादायक ठरू शकतात. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही ते सहजपणे अस्पष्ट करू शकता. ते काढण्याची प्रक्रिया खूप सोपी आहे. गुगल मॅप्सवरून लोकेशन कसे ब्लर करायचे ते आम्हाला कळवा...**

तुमची सर्व माहिती गुगलवर उपलब्ध आहे. एआय टचच्या प्रवेशानंतर, डेटा गोपनीयतेचा मुद्दा जोरात सुरू झाला आहे. जर आपण गुगल मॅपबद्दल बोललो तर तुमचा डेटा गुगलवर मोठ्या प्रमाणात वापरला जातो. विशेषतः गुगल मॅप स्ट्रीट व्ह्यूमध्ये घराच्या स्थानासह फोटो आणि व्हिडीओ असतात, जे तुमच्या गोपनीयतेसाठी धोकादायक ठरू शकतात. अशा परिस्थितीत, जर तुम्हाला गुगलने तुमच्या घराचे फोटो आणि व्हिडीओ गुगल मॅपवर दाखवू नये असे वाटत असेल, तर तुम्ही ते सहजपणे ब्लर करू शकता.

### काय कराल?

सर्वप्रथम गुगल मॅप उघडा. यानंतर गुगल मॅपवर तुमची मालमत्ता शोधा. यानंतर तुम्हाला जो स्ट्रीट व्ह्यू इमेज ब्लर करायचा आहे तो पर्याय उघडा. त्यानंतर तुम्हाला तुमच्या मालमत्तेवरील समस्या नोंदवा या पर्यायावर क्लिक करावे लागेल. यासाठी, तुम्हाला वरच्या उजव्या कोपऱ्यात क्लिक करावे लागेल आणि समस्या नोंदवा पर्यायावर टॅप करावे लागेल. त्यानंतर तुमच्या समोर एक पेज उघडेल, जिथे तुमच्या प्रॉपर्टीवर लाल रंगाचा आयकॉन दिसेल. तुम्ही तुमच्या गरजेनुसार आयकॉन बदलू शकता. यानंतर तुम्हाला कमांड द्यावी लागेल की तुम्हाला काय ब्लर करायचे आहे ? तुम्हाला A face, My home, my vehicle, a lifesail आणि A या वेगवेगळ्या ऑब्जेक्ट पर्यायांवर क्लिक करावे लागेल. तसेच, तुम्हाला ती प्रतिमा का अस्पष्ट करायची आहे याची माहिती द्यावी लागेल. त्यानंतर तुम्हाला तुमचा ईमेल आयडी टाकावा लागेल. कृपया लक्षात ठेवा की तुम्ही तुमचा ई-मेल आयडी न टाकता तुमचे स्थान अस्पष्ट करू शकत नाही. यानंतर तुम्हाला कॅप्चा कोड टाकावा लागेल. त्यानंतर तुम्हाला सबमिट बटणावर टॅप करावे लागेल. यानंतर तुमचे स्थान गुगल मॅपवर अस्पष्ट होईल. जेव्हा जेव्हा कोणी गुगल मॅप्सवरील स्ट्रीट व्ह्यू फीचर पाहेल तेव्हा त्यांना तुमचे स्थान अस्पष्ट दिसेल.



## स्मार्टफोन वापरताना होणाऱ्या चुका!

**सध्याच्या डिजीटल युगात अनेक गोष्टी आता स्मार्टफोनवर अवलंबून असल्याचं दिसून येत आहे. म्हणजे अगदी आपल्या मनोरंजनाच्या कामांपासून ते महत्त्वाच्याा कामांपर्यंत सारंकाही स्मार्टफोनवर अवलंबून असतं. दरम्यान अशात स्मार्टफोनच्या वाढत्या गरजांमुळे स्मार्टफोनचा वापरही आजकाल खूप प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे स्मार्टफोन काही काळासाठी खराब झाला किंवा बंद पडला तरी आपल्याला ते परवडत नाही. पण स्मार्टफोन वापरताना तुम्हाला अनेक गोष्टींची विशेष काळजी घ्यावी लागते. कारण तुमच्या एका चुकीमुळे तुमचा फोन बिघडून बंद होऊ शकतो. तसंच तुम्हाला हजारो रुपयाचं नुकसान देखील होऊ शकतं. आता तुम्ही विचार करत असाल की अशा कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी लागत असेल, तर याच काही गोष्टींबद्दल आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत...**

- अतिगेमिंग धोकादायक : मोबाईल फोन वापरताना अनेकजण बराच वेळ गेमिंग करत असल्याचं अनेकदा दिसून येतं. यामुळे स्मार्टफोनचा परफॉर्मन्सही खूप कमी होतो. म्हणूनच गेमिंग करताना तुम्ही प्रत्येक गोष्टीची बारकाईने काळजी घेतली पाहिजे. तसेच, सतत गेमिंग करणे देखील स्मार्टफोनच्या बॅटरीसाठी हानिकारक आहे. यामुळे तुमच्या स्मार्टफोनच्या मदरबोर्डवरही परिणाम होतो. ज्यामुळे तुम्हाला मोठं नुकसान होऊ शकते.
- चार्जिंग करताना काळजी घ्या : स्मार्टफोनची चार्जिंग ही एक महत्त्वाची गोष्ट असते. दरम्यान या चार्जिंगच्या वेळेवरही तुम्हाला खूप लक्ष द्यावे लागते. सतत चार्जिंग केल्यानेही स्मार्टफोन खराब होऊ शकतो. तसेच, ते दुरुस्त करण्यासाठी लांब जावं लागणार आहे. तसंच स्मार्टफोन चार्ज करताना काळजी घ्यावी लागणार आहे, कारण चार्जिंगची वेळ देखील खूप महत्वाची आहे. ओव्हरचार्जिंग देखील स्मार्टफोनसाठी हानिकारक आहे.
- सतत लेटेस्ट अपडेट कराः अनेक वेळा आपण पाहतो की, स्मार्टफोन सतत वापरूनही अपडेट करत नाही. हे तुमच्या डिव्हाइससाठी चांगले नाही. त्यामुळे तुम्हाला अनेक गोष्टींची विशेष काळजी घ्यावी लागेल. जर तुमचा स्मार्टफोन अपडेटेड असेल तर त्याचे हार्डवेअर आणि सॉफ्टवेअर दोन्ही चांगले काम करतील. यामुळेच तुम्ही वेळोवेळी फोन अपडेट करत राहावे. असे न करणे तुमच्या फोनसाठी देखील हानिकारक आहे.

### जास्त कनेक्टिव्हिटी टाळणं गरजेचं

आजकाल आपला फोन सतत इंटरनेटशी कनेक्ट असतो, म्हणजे कायम त्याचं इंटरनेट ऑनच असतं. पण अशामध्ये सतत इंटरनेटशी फोन कनेक्ट केल्याने तुमची बॅटरी जलदगतीने संपू शकते. ज्यामुळे स्मार्टफोन लवकर खराब होऊ शकतो. तसंच मोबाईल हॉटस्पॉट वापरणे, दीर्घ काळासाठी GPS वापरणे, व्हिडिओ पाहणे, म्युझिक ऐकणे यामुळे तुमची बॅटरी कमी असताना ती आणखीच उतरू शकते. तसंच कॉलिंगमुळेही बॅटरी उतरते. विशेष म्हणजे रोमिंगमध्ये प्रवास करताना जास्त कॉल केले तरी बॅटरी लवकर संपते. त्यामुळे चार्ज कमी असताना सततची कनेक्टिव्हिटी टाळणं गरजेचं आहे.



### हेवी ॲप्लिकेशनचा वापर टाळा

अनेक रिपोर्ट्समधून आणि प्रॅक्टिकलमधून हे समोर आलं आहे की, बॅटरी जास्त काळ वापरण्यासाठी, कमी चार्जमध्ये असताना मोठमोठ्या म्हणजेच हेवी ॲप्लिकेशन्सचा वापर करणं टाळायला हवं. म्हणजेच तुम्ही कॅमेराचा जास्त वापर करू नये किंवा कोणतेही अधिक बॅटरी खाणारे ॲप्लिकेशन्स सतत वापरणे टाळावे. जसं की सोशल मीडियावर रिल्स पाहणे, मोठ्या ग्राफिक्सचे गेम खेळणे, या साऱ्या गोष्टी करणं टाळावं लागणार आहे.



## Google Maps वापरताना...

**तुम्ही Google Maps चा वापर करत असाल तर आधी ही बातमी वाचा. Google Maps चा वापर करून अनेक जण रोज आपल्या ठरलेल्या ठिकाणी पोहोचतात. मार्ग माहित नसताना Google Maps हेच कामी येते, पण यावेळी Google Maps चा वापर केल्याने तीन जणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. उत्तर प्रदेशातील बरेली जिल्ह्यातील फरीदपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत GPS ची अचूक माहिती न मिळाल्याने हा अपघात घडला. अशावेळी Google Maps वापरताना काही महत्त्वाच्या गोष्टींची काळजी घेणं अत्यंत गरजेचं आहे...**

### कोणती काळजी घ्यावी ?

- Google Maps बहुतेक अचूक माहिती देत असले तरी काही वेळा त्यावर अवलंबून राहणे धोक्याचे ठरते.
- काही दिवसांपूर्वी Google Maps मुळे दोन मित्र चुकीच्या वाटेवर गेले होते. ज्यामुळे अपघात झाला.
- Google Maps वरून तुम्ही कुठे जात असाल तर चालण्यापूर्वी एकदा तपासून घ्या की Google Maps वर चुकीची ॲक्टिव्हिटी तर नाही ना.
- कधी कधी Google Maps नदी, अज्ञात किंवा निर्जन मार्ग दाखवतो आणि काही लोक त्यावर चालतात, परंतु असे करणे धोकादायक असू शकते. त्यामुळे हे टाळले पाहिजे.
- Maps समजत नसेल तर स्थानिक लोकांची मदत घेण्याचा प्रयत्न करा. त्यासाठी तुम्हाला काही मिनिटे लागतील, पण माहिती बरोबर असेल.
- Google Maps च्या नवीन फीचर्ससह स्वतः ला अपडेट ठेवणे खूप महत्वाचे आहे, जेणेकरून तुम्ही अडचणीत अडकल्यास तुम्हाला या फीचर्सची मदत मिळू शकेल.
- कोठेही जाण्यापूर्वी Google Maps अपडेट करणे देखील खूप महत्वाचे आहे.

### Google Maps वर कधी विश्वास ठेवावा ?

- Google Maps वर आंधळेपणाने विश्वास ठेवणे योग्य नाही. तुम्ही Google Maps ची मदत घेऊ शकता, पण त्यावर अवलंबून राहू शकत नाही. जर तुम्ही मोठ्या रस्त्यावरून जात असाल तर इथेच Google Maps काम करतो, कमकुवत इंटरनेट असेल तर Google Maps तुम्हाला अडचणीत आणू शकतो. त्यामुळे नेहमी योग्य इंटरनेट कनेक्शन ठेवा. तसेच Google Maps वापरताना सावधगिरी बाळगणे अत्यंत गरजेचे आहे.

### लोकांकडून मार्गाची योग्य माहिती मिळवा

- Google Maps अशा ठिकाणी चुकीचा मार्ग दाखवतो, जो फारसा सामान्य नसतो आणि नवीन असतो, असे अनेकदा दिसून आले आहे. अशा वेळी तेथील लोकांकडून मार्गाची योग्य माहिती मिळवणे हाच उत्तम मार्ग आहे.

## ग्रहांची परेड...

### सर्व ग्रह येणार एका रांगेत !; भारतात हे दुर्मिळ दृश्य कधी दिसेल ?

**खगोलशास्त्रात रस असलेल्यांना २८ फेब्रुवारी रोजी आकाशात एक दुर्मिळ दृश्य पाहण्याची संधी मिळेल. या काळात, सूर्यमालेतील सर्व ग्रह अंतराळात एकत्र दिसतील. या घटनेला ग्रह परेड म्हणतात. २८ फेब्रुवारीची रात्र गेल्या महिनाभरापासून सुरू असलेल्या ग्रहांच्या परेडचा कळस असेल. शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की ही परेड खूपच दुर्मिळ आहे आणि पुढील १५ वर्षांपर्यंत ती पुन्हा दिसणार नाही. यानंतर, ग्रहांची अशी परेड फक्त २०४० मध्येच पाहता येईल.**

२८ फेब्रुवारी रोजी आकाशात ग्रहांची ही एक दुर्मिळ भेट असेल, जेव्हा सर्व ग्रह थोड्या काळासाठी एकत्र दिसतील. हे पाहण्यासाठी शहरातील दिव्यांपासून दूर असलेल्या मोकळ्या मैदानात जाणे चांगले राहील, असे तज्ञांचे म्हणणे आहे. जर या काळात हवामान स्वच्छ राहिले तर युरेनस आणि नेपच्यून वगळता सर्व ग्रह उघड्या डोळ्यांनी दिसतील. युरेनस आणि नेपच्यून पाहण्यासाठी तुम्हाला दुर्बिणीची आवश्यकता असेल. तज्ञांच्या मते, पूर्वेला मंगळ, आग्नेय दिशेला गुरु आणि युरेनस तर पश्चिमेला शुक्र, नेपच्यून आणि शनि दिसतील.



### ग्रहांची ही परेड विशेष का आहे ?

खगोलशास्त्रज्ञांच्या मते, जेव्हा ग्रह सूर्याच्या एका बाजूला एकत्र दिसतात तेव्हा ग्रहांची परेड होते. या परेडमध्ये तीन ते आठ ग्रहांचा समावेश असू शकतो. एका प्रमुख परेडमध्ये सहसा पाच किंवा सहा ग्रह असतात. २८ फेब्रुवारी रोजी घडणारी ही ग्रहांची परेड सर्वात दुर्मिळ घटना आहे. गेल्या महिन्यात, जानेवारीमध्ये आंशिक ग्रहांच्या परेडसह क्वाड्रंटिड उल्कावर्षाव झाला. २८ फेब्रुवारी रोजी होणारा कार्यक्रम दुर्मिळ असल्याने तो खूप खास असण्याची अपेक्षा आहे. ग्रहांची ही परेड संपूर्ण भारतात दिसून येईल. देशातील बहुतेक शहरांमध्ये लोकांना हा दुर्मिळ कार्यक्रम पाहता येईल. जर हवामान स्वच्छ नसेल तर दुर्बिणीद्वारे हे दृश्य अनुभवता येते. खगोलशास्त्रज्ञ या घटनेची वाट पाहत होते.

### ग्रहांची परेड कधी होते ?

ग्रहांची परेड म्हणजे पृथ्वी आणि सौर मंडळातील इतर ग्रह सूर्याच्या एका बाजूला सरळ रेषेत येणार आहेत. ही शक्यता दुर्मिळ आहे. कारण सर्व ग्रह एकाच बाजूला येत नाहीत. परंतु काही ग्रह एका रेषेत येतात. सहा ग्रहांचे एका ओळीत येणे देखील खूप खास आहे. जेव्हा ग्रह आकाशात सरळ रेषेत दिसतात तेव्हा ही घटना आणखी नाट्यमय होते.

## २, ३ की ४? उन्हाळ्यात फ्रिज किती नंबरवर चालवावे?

**तुम्हाला फ्रिज ऋतूनुसार किती नंबरवर सेट करावे किंवा चालवावे, याविषयीची माहिती आहे का ? आता उन्हाळा येत असून उन्हाळ्यात फ्रिज किती नंबरवर चालवायला हवे ? याची माहिती असणं गरजेचं आहे. नसेल माहिती तर चिंता करू नका. आज आम्ही तुम्हाला याविषयीची सविस्तर माहिती देणार आहोत. तसेच फ्रिज लवकर खराब होऊ नये, यासाठी काय करायला हवं, हे देखील जाणून घ्या.**

आजकाल प्रत्येक घरात फ्रिजचा वापर केला जातो. विशेषतः उन्हाळ्यात हे खूप महत्त्वाचं ठरतं. आता बाजारात चांगले फ्रिज कमी किमतीत मिळत असल्याने ते खरेदी करणे सोपे झाले आहे. परंतु बरेच लोक त्याच्या देखभालीकडे लक्ष देत नाहीत. यामुळे फ्रिज लवकर खराब होऊ शकते किंवा ब्लास्टिंगचा धोका वाढू शकतो. तुम्हालाही तुमच्या फ्रिजचा बराच काळ योग्य वापर करायचा असेल तर या महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचं आहे.

### फ्रिजसाठी योग्य तापमान किती असावे?

फ्रिज कोणत्या तापमानावर सेट करावा किंवा चालवावा याचा विचार अनेकदा लोक करतात. बहुतेक फ्रिजमध्ये तापमान १ ते ५ आकड्यांपर्यंत सेट केले जाऊ शकते. उन्हाळ्यात फ्रिज ३ ते ४ क्रमांकावर ठेवणे चांगले, जेणेकरून खाणे-पिणे व्यवस्थित थंड होईल आणि खराब होणार नाही. हिवाळ्यात काही लोक फ्रिज बंद करतात, हा योग्य मार्ग नाही. थंड हवामानात फ्रिज १ नंबरवर चालवावे. फ्रिज बराच वेळ बंद ठेवल्यास त्याचा कॉम्प्रेसर जॅम होऊन गरम होऊ शकतो आणि चालू केल्यावर खराब होऊ शकतो.

### फ्रिजच्या स्फोटाची कारणे कोणती?

अनेकदा फ्रिजमध्ये बिघाड झाला की लोक लोकल पार्टचा वापर करतात. पण, हे खूप धोकादायक ठरू शकते. विशेषतः कॉम्प्रेसरशी संबंधित बिघाडासाठी नेहमी कंपनीच्या सर्व्हिस सेंटरमधून दुरुस्ती करून घ्या. स्थानिक भागांचा वापर केल्यास कॉम्प्रेसरमधील दाब वाढू शकतो आणि त्याचा स्फोट होऊ शकतो. त्यामुळे फ्रिजच्या कोणत्याही बिघाडाकडे दुर्लक्ष करू नका आणि नेहमी ओरिजिनल पार्ट्सचा वापर करा.

### फ्रिज वारंवार उघडू नका

फ्रिज उघडताच बाहेरची गरम हवा आत जाते आणि थंड हवेत मिसळून ओलावा निर्माण होतो. यामुळे बर्फ आत गोठतो. असं झाल्याने फ्रीजरच्या योग्य कार्यात अडथळा येऊ शकतो. फ्रिजमध्ये कमी बर्फ हवा असेल तर गरज असेल तेव्हाच उघडा.



# पारनेर महाविद्यालयात रसायनशास्त्रावर विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

## विद्यार्थ्यांनी घेतला प्रयोगशील शिक्षणाचा अनुभव




**पारनेर: प्रतिनिधी**

**येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज, पारनेरच्या रसायनशास्त्र विभागाच्या वतीने 'रसायनशास्त्राच्या मूलभूत संकल्पनां' वर विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्धाटन अहमदनगर येथील रसायनशास्त्र विभागाच्या प्रा.सुषमा दरे यांच्या हस्ते करण्यात आले.**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. आहेर होते. यावेळी रसायनशास्त्र विभागप्रमुख व उपप्राचार्य डॉ. टी. एस. थोपटे आणि समन्वयक प्रा. अश्विनी ठुबे उपस्थित होते.
या विज्ञान प्रदर्शनामध्ये पारनेर पब्लिक स्कूल आणि न्यू इंग्लिश स्कूल, पारनेरच्या इयत्ता ८ वी व ९ वीच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. विद्यार्थ्यांनी प्रयोगशील शिक्षणाचा अनुभव घेतला आणि विविध प्रयोगांचे निरीक्षण केले.

''विद्यार्थ्यांनी तयार केलेले प्रयोग आणि पोस्टर्स पाहून त्यांच्या सृजनशीलतेचा आणि संशोधनवृत्तीचा प्रत्यय आला. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना रसायनशास्त्र विषय समजण्यास आणि त्यांच्या प्रयोगशील कौशल्यांचा विकास होण्यास मदत होते. भविष्यात अशा प्रकारच्या प्रदर्शनांचे आयोजन होत राहावे.'' असे मत प्रमुख पाहुणे प्रा. सुषमा दरे यांनी व्यक्त केले.

प्राचार्य डॉ.आहेर म्हणाले की, ''विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता प्रयोगशील शिक्षण देणे गरजेचे आहे. अशा विज्ञान प्रदर्शनांच्या माध्यमातून त्यांची वैज्ञानिक दृष्टी विकसित होते आणि नव्या संकल्पनांवर विचार करण्याची प्रेरणा मिळते. महाविद्यालयाच्या वतीने अशा उपक्रमांना नेहमीच पाठिंबा दिला जाईल.''

रसायनशास्त्र हा प्रयोगाधारित विषय असून, त्याच्या सखोल अध्ययनासाठी प्रयोग करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी केलेले प्रयोग उत्कृष्ट होते आणि त्यांच्या मेहनतीचे कौतुक करावे तितके कमीच आहे. भविष्यात विद्यार्थ्यांना अधिक संधी उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न राहील. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि संशोधनवृत्तीला चालना मिळते.'' असे मत विभागप्रमुख व उपप्राचार्य डॉ. टी. एस. थोपटे यांनी व्यक्त केले.

**प्रदर्शनातील ठळक बाबी:**

एकूण प्रयोग सादर: २७
एकूण पोस्टर्स: ४५
वैज्ञानिक रांगोळी: १५

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे योगदान मोठे राहिले. उपस्थित प्राध्यापकांमध्ये डॉ. डी. आर. ठुबे, डॉ. एस. एम. कळे, डॉ. आर. एस. डीग्गीकर, प्रा. बी. एस. नरसाळे, प्रा. एस. डी. म्हस्के, प्रा. ए. जे. ढोले, प्रा. पी. एन. डौले, डॉ. एस. जी. कुंडलिकर, प्रा. व्ही. जी. शेळके, प्रा. व्ही. आर. दुधाडे आणि डॉ. मनीषा देवकाते यांचा समावेश होता.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल प्राचार्य डॉ. आर. के. आहेर यांनी संपूर्ण रसायनशास्त्र विभागाचे आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# अण्णांच्या भारतरत्नसाठी शिष्टमंडळ दिल्लीला जाणार

## सामाजिक कार्यकर्ते बाजीराव भोर यांची माहिती | राष्ट्रपती व पंतप्रधानांची भेट घेणार



**राळेगण सिद्धी : प्रतिनिधी**

**ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना भारतरत्न देण्यात यावा या मागणीसाठी रेनवडी येथील सामाजिक कार्यकर्ते बाजीराव भोर शिष्टमंडळ घेऊन लवकरच राष्ट्रपती व पंतप्रधान यांच्याकडे शिष्टमंडळ घेणार असल्याची माहिती भोर यांनी दिली.**

श्री. भोर यांनी नुकतीच राळेगणसिद्धी येथे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली.सामाजिक कार्यकर्ते बाजीराव भोर साहेब समवेत सरपंच जयसिंग मापारी,दत्ता आवारी उपस्थित होते.अण्णांनी जे सामाजिक काम केले त्यासाठी त्यांना सरकारने भारतरत्न पुरस्कार द्यावा याबाबत भेट घेऊन अण्णा हजारे यांना भारत सरकारचा सर्वोच्च पुरस्कार भारतरत्न मिळावा यासाठी त्यांनी राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांना आणि शासनाशी केलेला पत्रव्यवहार आणि वर्तमान पत्रातील बातम्या भोर यांनी हजारे यांना दाखवल्या. सामाजिक कार्यकर्ते भोर याबाबत नवी दिल्ली येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# रामन इफेक्टचा शोध हाच राष्ट्रीय विज्ञान दिनाचा पाया- डॉ. जयसिंग गाडेकर

## अळकुटी महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा

**अळकुटी : प्रतिनिधी**

**विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान परिषद आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. एकूणच रामन इफेक्टचा शोध हाच राष्ट्रीय विज्ञान दिनाचा पाया आहे. असे प्रतिपादन डॉ. जयसिंग गाडेकर यांनी केले.**

पद्मभूषण लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अळकुटी येथे विज्ञान मंडळांतर्गत सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ चंद्रशेखर वेंकट रामन यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय विज्ञान दिनाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कुंदा कवडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या.

याप्रसंगी डॉ. कवडे म्हणाल्या की, राष्ट्रीय विज्ञान दिनाचे मूळ उद्दिष्ट विद्यार्थ्यांना



विज्ञानाकडे आकर्षित करणे आणि त्यांना प्रेरित करणे आणि विज्ञान आणि वैज्ञानिक कामगिरीबद्दल लोकांना जागृत करणे हा आहे. विज्ञानाशिवाय विकासाचा मार्ग वेगाने पुढे जाऊ शकत नाही. विज्ञान गैरसमज आणि अंधश्रद्धा नष्ट करते असे म्हटले. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक पोस्टर स्पर्धेत भाग घेऊन जवळपास ५० हून अधिक वैज्ञानिक पोस्टर प्रसिद्ध केले.

यावेळी उपप्राचार्य अमोल नालकर, डेअरी डिप्लोमा प्राचार्य प्रशांत लोखंडे, प्रा.अर्जुन चाटे, प्रा. सुषमा करकंडे, डॉ. शांता थोरात, गोरख घोलप, सूर्यमाला भोर, प्रा. विशाल रोकडे, प्रा. संजय जाधव, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. संदीप गेटम, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. पूजा वैरागर, प्रा. सुनिता जाधव, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. अनुराधा गाढवे, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, प्रा. पांडुरंग उघडे, प्रा. शिवाजी शेळके, प्रा. मच्छिन्द्र बेलोटे, प्रा. मोहन माने, प्रा. सचिन बलसाने, प्रा. ऋषिकेश गिते, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा. राजाराम गोरडे, सुनिता भालेराव, नितीन घोलप, छाया म्हस्के, विकास सोनवणे, राहुल बोरुडे, सागर शितोळे, मनोहर कनिंगध्वज व विद्यार्थी उपस्थित होते.

विज्ञान मंडळाच्या प्रमुख प्रा. पूजा वैरागर यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी विशेष श्रम घेतले. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा. पांडुरंग उघडे यांनी केले, सूत्रसंचालन प्रा. अनुराधा गाढवे यांनी केले. पाहुणे परिचय प्रा. सचिन बलसाने यांनी केला तर आभार प्रा. सुषमा करकंडे यांनी केले.

# भारतीय ज्ञान परंपरा जागतिक पातळीवर अव्वल

## प्रा. डॉ. प्रदीप दिघे यांचे प्रतिपादन

**अळकुटी : प्रतिनिधी**

**जागतिक पातळीवर प्राचीनतम वारसा लाभलेल्या संस्कृतींपैकी भारतीय संस्कृती अव्वल दर्जाची आहे. भारतीय संस्कृतीतील ज्ञान परंपरा ही अगदीच ऋषीमुनींपासून संत परंपरेपर्यंत ते अगदी आजच्या आधुनिक लेखकांपर्यंत प्रवाही पद्धतीने चालत आलेली आहे. या भारतीय ज्ञान परंपरेचा पुन्हा एकदा साकल्याने अभ्यास करणे आजची गरज बनली आहे. असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य तथा पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रदीप दिघे यांनी केले.**




पद्मभूषण लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अळकुटी येथे भारतीय ज्ञान व्यवस्थेबाबत बहुविद्याशाखीय दृष्टिकोन या विषयावर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य डॉ. प्रदीप दिघे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

या परिषदेप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. महेश खर्डे, प्राचार्य डॉ. कुंदा कवडे, पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब रणपिसे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे सदस्य डॉ. शांताराम चौधरी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या इंग्रजी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. आनंद कुलकर्णी,अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे जेष्ठ विश्वस्त सीताराम अण्णा खिलारी, दिनेश बाबर, भाऊसाहेब डेरे यांनी उपस्थितांना संबोधित केले.

या परिषदेकरिता विविध महाविद्यालयातील संशोधक तथा प्राध्यापकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदविला. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी परिषद यशस्वीतेसाठी विशेष श्रम घेतले. याप्रसंगी उपप्राचार्य अमोल नालकर, डेअरी डिप्लोमा प्राचार्य प्रशांत लोखंडे, गोरख घोलप, सूर्यमाला भोर, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, प्रा. पांडुरंग उघडे, प्रा. शिवाजी शेळके, प्रा. मच्छिन्द्र बेलोटे, प्रा. मोहन माने, प्रा. सचिन बलसाने, प्रा. ऋषिकेश गिते, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा. राजाराम गोरडे, सुनिता भालेराव, नितीन घोलप, छाया म्हस्के, विकास सोनवणे, राहुल बोरुडे, सागर शितोळे, मनोहर कनिंगध्वज व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्राचार्या डॉ. कुंदा कवडे यांनी केले परिषदेचे सत्रनिहाय सूत्रसंचालन प्रा. विशाल रोकडे, प्रा. पूजा वैरागर, प्रा. सुनिता जाधव, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. अनुराधा गाढवे, प्रा. स्वाती फापाळे यांनी केले. सत्रनिहाय पाहुणे परिचय प्रा. संजय जाधव, प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. संदीप गेटम, प्रा. पोपट सुंबरे यांनी केला तर सत्रनिहाय आभार प्रा.अर्जुन चाटे, प्रा. सुषमा करकंडे, डॉ. शांता थोरात, प्रा. विशाल रोकडे यांनी केले.

# खा.लंके यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

## मुंबई प्रतिष्ठानचा उपक्रम

**कामोठे : प्रतिनिधी**

**येत्या १० मार्च रोजी साजऱ्या होणाऱ्या खासदार नीलेश लंके यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून कामोठे येथील नीलेश लंके प्रतिष्ठानच्या रविवार दि. ९ मार्च रोजी वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.**




रविवारी सकाळी१० वाजता या रक्तदान शिबिराचे उद्धाटन करण्यात येणार असून सायंकाळी सहा वाजेपर्यंत हे शिबिर चालणार आहे. कामोठे येथील प्लॉट नं.२३ सेक्टर ९ येथील मा. आमदार दत्तूशेठ पाटील हायस्कुलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या रक्तदान शिबिरात मोठया संख्येने सहभाग नोंदविण्याचे आवाहन नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

मुंबई येथील नीलेश लंके प्रतिष्ठान हे विविध सामाजिक उपक्रमांमध्ये नेहमीच अग्रेसर असते. अलिकडेच प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दहीहंडी उत्सवास संपूर्ण मुंबई नगरीतून प्रतिसाद लाभला. मुंबई स्थित पारनेरकरांच्या मदतीसाठी मुंबई प्रतिष्ठान नेहमीच आघाडीवर राहिले आहे. प्रतिष्ठानमुळे मुंबईतील पारनेरकरांना एक हक्काचा खंबीर आधार असून प्रत्येकाच्या सुख-दुःखात सहभागी होऊन आपली सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम प्रतिष्ठानच्या माध्यमातून करण्यात येते.

जगभर कोरोना महामारीमुळे भितीचे वातावरण असताना मुंबईस्थित पारनेरकरांना मदतीचा हात देण्यात प्रतिष्ठानचे शिलेदार आघाडीवर होते. कोरोना बाधित रूग्णांना उपचार, रूग्णालयात बेड उपलब्ध करून देणे, आवष्यक औषधे उपलब्ध करून देणे, लॉकडाउननंतर मुंबईस्थित पारनेरकरांना त्यांच्या गावी पोहचविण्यासाठीही प्रतिष्ठानच्या सदस्यांनी पारनेरकरांना मोठी मदत केली. खा. नीलेश लंके हे कोणत्याही व्यक्तीला मदतीचा हात देण्यासाठी अग्रभागी असतात. त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत त्यांचे सहकारीही सामाजिक कामात आपले कर्तव्य बजावत असल्याचे आजवर अनेकदा अनुभवण्यास मिळाले आहे.

### पाच लाखांचा विमा

**या शिबिरामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास ५ लाख रूपयांचे विमा सुरक्षा कवच देण्यात येणार आहे. रक्तदात्यास अजीवन तर त्यांच्या नातेवाईकांना एक वर्षे मोफत रक्त देण्यात येणार आहे. रक्तदानासाठी येताना आधारकार्ड व पॅनकार्ड घेऊन येण्याचे आवाहन करण्यात आले आहे.**

# पारनेर आगारास टप्प्या-टप्प्याने बसेस मिळणार

## महाव्यवस्थापकांची आ. दाते यांना ग्वाही



**पारनेर : प्रतिनिधी**

**राज्य परिवहन महामंडळाच्या पारनेर आगारास टप्प्या-टप्प्याने नव्या बसेस देण्याची ग्वाही महामंडळाच्या महाव्यवस्थापकांनी आमदार काशिनाथ दाते यांना दिली.**

पारनेर आगारातील बसेसची कमी असलेली संख्या तसेच आहे त्या बसेसची दुरावस्था झाल्याने पारनेर आगारास नव्या बसेस मिळाव्यात अशा मागणीचे निवेदन आ. दाते यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना सादर केले होते. सरनाईक यांनी दाते यांचे निवेदन पुढील कार्यवाहीसाठी महाव्यवस्थापकांकडे पाठविल्यानंतर महाव्यवस्थापकांनी दाते यांना पत्र पाठवून बसेस टप्प्या-टप्प्याने देण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले.

पारनेर आगारातील बसेस जिर्ण व जुन्या झाल्याने त्या बसेसमधून प्रवास प्रवाशांसाठी धोकादाय आहे. तालुक्यातील वृध्द, महाविद्यालयीन व शाळकरी विद्यार्थी, विद्यार्थीनी, रूग्ण व इतर प्रवाशांना सतत बिघडणाऱ्या बसेसमुळे अनेकदा मनस्ताप सहन करावा लागतो. मागील २०-२५ वर्षात पारनेर आगारास एकही नवी बस उपलब्ध झालेली नसल्याने दाते यांनी परिवहन मंत्री सरनाईक यांचे लक्ष वेधत नव्या बसेसची मागणी केली होती. महाव्यवस्थापकांना मंत्री सरनाईक यांनी निर्देश दिल्यानंतर राज्यातील सर्व आगारांमध्ये नव्या बसेस येणार असल्याने पारनेर आगारासही नव्या बसेस टप्प्याने उपलब्ध करून देण्यात येतील असे आ. दाते यांना कळविण्यात आले आहे.

# विज्ञानाची आवड प्रदर्शनांतून बहरते !

## डॉ.दिपक आहेर यांचे प्रतिपादन | मातोश्री शैक्षणिक संकुलात | विज्ञान प्रदर्शनाचे उद्धाटन

**कर्जुले हर्या : प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांनी आपली जिज्ञासा जागृत ठेवून प्रत्येक गोष्टीत वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत ठेवावा,विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देण्यासाठी व त्यांच्यातील प्रयोगशीलता वाढविण्यासाठी विज्ञान प्रदर्शन नियमितपणे आयोजित करणे ही काळाची गरज आहे.विज्ञानाची आवड विज्ञान प्रदर्शनांतून बहरते आसे प्रतिपादन डॉ.दिपक आहेर यांनी केले.**



कर्जुले हर्या(ता.पारनेर)येथील मातोश्री शैक्षणिक संकुलात विज्ञान प्रदर्शनाचे उद्धाटन डॉ.आहेर यांच्या हस्ते पार पडले त्यावेळी ते बोलत होते.यावेळी औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राहुल रहाणे,विद्यालयाचे प्राचार्य राहुल सासवडे संस्थेच्या संचालिका डॉ. श्वेतांबरी आहेर,शितल आहेर,सत्तार शेख उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून वैज्ञानिक जाणिवा विकसित करण्याचे आवाहन उपस्थितांना केले.प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी ग्लोबल वार्मिंग,जल शुद्धीकरण,जल वायू प्रदूषण,सौर ऊर्जा,हरीत गृहे,वाहतूक नियंत्रण,विषमुक्त शेती,ग्रहमला,घन कचरा व्यवस्थापन,विविध गणिती संकल्पना आदी संकल्पनांवर आधारीत विविध उपकरणे सादर केली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विज्ञान विभाग प्रमुख जाफर शेख व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# सभापती रासकर,सुपेकर व कारखिले यांचा सत्कार

## राळेगण थेरपाळ ग्रामस्थांच्या वतीने आयोजन

**राळेगण थेरपाळ : प्रतिनिधी**

**येथील प्रगतशील शेतकरी उद्यान पंडित पुरस्कार प्राप्त बाळासाहेब कोंडीबा कारखिले यांची अखिल महाराष्ट्र सीताफळ बागायतदार महासंघाच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल तसेच पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदी किसनराव रासकर व उपसभापतीपदी किसनराव सुपेकर यांची निवड झाल्याबद्दल राळेगण ग्रामस्थांच्या वतीने राज्याचे कृषी उपमहासंचालक कुंडलिकराव कारखिले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.**



यावेळी राजेंद्र शितोळे यांनी प्रास्ताविक केले. बाबाजी ठुबे ,ग्रामपंचायत सदस्य किरण बाळासाहेब कारखिले, किरण भगवान कारखिले, पै.बाजीराव कारखिले ,बाबातात्या कारखिले, मा.चेअरमन अंकुश कारखिले,वाल्मीकतात्या कारखिले, सुखदेव कारखिले,संतोष कारखिले, अशोक कारखिले उल्हास गाडीलकर, सोमनाथ कारखिले, अशोक गाडीलकर, शशिभाऊ कारखिले,कोंडीभाऊ घावटे, बाबाजी कारखिले बाळासाहेब बेंडाले पोपट काणे, अशोक कारखिले,मा. सरपंच सतीश गाडीलकर, रायचंद कारखिले, भाऊ डोमे,लक्ष्मण कारखिले ,शांताराम कारखिले मेजर, अनिल कारखिले, मेजर विजय कारखिले, रवींद्र कारखिले, भगवानराव गाडीलकर, रामदास कारखिले,राजूभाऊ कारखिले, संतोष डोमे, संभाजी घावटे, रमेश कारखिले, आबा कारखिले, तंटामुक्ती अध्यक्ष दीपक कारखिले,मा.सरपंच कैलास डोमे, शशी कारखिले, नरेश सोनवणे, साबळे सर, गणेश कारखिले, साहेबराव काकडे, गणेश बांदल, भरतशेठ शितोळे, आदी मान्यवर उपस्थित होते.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com